**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:अपंग-२०००/(२३७२/२०००)/प्राशि-१.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ फेब्रुवारी,२०००.

प्रति,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद.

विषय :- अपंग विद्यार्थ्यांना सामान्य प्राथमिक शाळांमधून दाखल करुन घेण्याबाबत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अपंग विद्यार्थ्यांना सामान्य शाळांमधून शिक्षण देणे अपेक्षित आहे. फक्त मोठया प्रमाणावर अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांनाच अपंगांसाठी असलेल्या विशेष शाळांमधून शिक्षण देणे आवश्यक आहे. अपंग व्यक्ती (समान संधी,अधिकार संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ मध्येही अपंग विद्यार्थ्यांना सामान्य शाळांतून दाखल करुन घेण्यावर भर देण्यात आला आहे. ज्या विद्यार्थ्यांना शारीरिक अपंगत्वाशिवाय अन्य कोणतेही अपंगत्व नाही अशा विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमधून दाखल करुन घेणे आवश्यक आहे.

२. अपंग विद्यार्थ्यांनाही सामान्य शाळांतून दाखल करुन घेतल्याशिवाय प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य करता येणार नाही. परंतु प्रत्यक्षात एकूण अपंग मुलांपैकी फक्त २ टक्के मुलांना शाळेत दाखल करुन घेण्यात आलेले आहे. समाज,पालक आणि शिक्षक यांच्यामध्ये अपंग मुलांबाबत असलेला काहीसा पूर्वग्रह आणि जाणीवेचा अभाव यामुळे अपंग मुलांना सामान्य शाळांमधून प्रवेश नाकारण्यात येतो. काही जिल्हयांमधून अपंग एकात्मिक शिक्षण कार्यक्रम, जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम किंवा स्वयंसेवी संस्थांमधून अपंग व्यक्तींना सर्वसामान्य शाळांतून दाखल करुन घेण्याचे प्रयत्न केले जातात. परतु त्याची स्वतंत्र नोंद केली जात नाही.

३. मा.मनुष्यबळ विकास मंत्री,केंद्र शासन यांनी अपंग मुलांना सामान्य शाळांमधून दाखल करुन घेण्यासाठी मोहिमेच्या स्वरुपात काम करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केलेले आहे. सर्वच अपंग विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळा सुरु करणे हे व्यवहार्य व आवश्यक नाही. शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळांमधून दाखल करुन घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आगामी शैक्षणिक वर्षापासून शरीरिकदृष्टया अपंग मुलांनाही शाळेमध्ये दाखल करुन घेण्यात यावे व त्यासाठी पटनोंदणी सप्ताहामध्ये विशेष प्रयत्न करण्यात यावेत. विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचा अहवाल सादर करताना शिक्षणाधिकारी किती अपंग मुलांना दाखल करुन घेतले आहे याची स्वतंत्र माहिती सादर करावी. या माहितीच्या आधारे केंद्र शासनास व राज्य शासनास अपंग मुलांसाठी योजना तयार करण्याकरिता उपयोग होईल.

४. तरी आपणांस पुनःश्च विनंती करण्यात येते की, आगामी शैक्षणिक वर्षापासून सर्वसामान्य प्राथमिक शाळांमधून शारीरिकदृष्टया अपंग मुलाना दाखल करुन घेण्याच्या दृष्टीने विशेष मोहीम सुरु करण्यात यावी व प्रत्येक शाळेमध्ये अशा किती अपंग मुलांना दाखल करुन घेण्यात आले आहे याचीही माहिती घेण्यात यावी.

कृपया पोच द्यावी.

सही/-
( रमेशचंद्र कानडे )
सचिव
शालेय शिक्षण विभाग.